**नि.दि.दा.क्र. ३३६/२०२५**

## आदेश निशाणी क्र. ०१ खाली

प्रस्तुत दावा हा १. कार्यकारी अभियंता, सार्वजानिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन २. उप अभियंता, सार्वजानिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, ३. भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज, ४. महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हाधिकारी, सांगली व इतर प्रतिवादींविरुध्द आरग ते लिंगनूर रस्ता विषयी कारक ताकीदन मनाई हुकूमासाठी, निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी व इतर तदनुषंगिक दादींसाठी दाखल केलेला आहे. सदर रस्ता हा विशिष्ट मदत (बदल २०१८) कायदयान्वये पायाभुत सुविधा प्रकल्प या सदराखाली येत असल्याने, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे नोटीफिकेशन क्र. एसपीसी.१३१८/सी.आर.२४२/डी दि. २९.०६.२०२१ प्रमाणे सांगली जिल्हयातील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, मा. दुसरे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर व मा. तिसरे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांनाच चालवण्याचे अधिकार आहेत. प्रस्तुत दिवाणी मुकदमा चालवण्याचे अधिकार या न्यायालयाला नाहीत. त्यामुळे, सदरचा मुकदमा योग्य त्या मा. न्यायालयाकडे चालविण्यासाठी वर्ग होणबाबत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, सांगली यांना सिव्हील मॅन्युअल पॅरा क्र. २३३ प्रमाणे पत्र पाठवून सदर दावा योग्य त्या न्यायालयाकडे वर्ग होणेबाबत विनंती करणे आवश्यक आहे. सबब, तसे पत्र पाठवण्यात यावे.

ASARAM RAGHUNATH KALHAPURE

Digitally signed by ASARAM RAGHUNATH KALHAPURE
Date: 2026.07.20 17:33:34 +0530

सांगली. (आ. र. कल्हापुरे)
दि. २०.०७.२०२६. ०७ वे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर,
सांगली.